१६३

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.


:: प्रधान कार्यालय ::

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१,    दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९


## बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये वास्तव्य असलेल्या आणि शासनाच्या वेगवेगळया महामंडळापैकी कोणत्याही एका महामंडळाकडील वैयक्तिक कर्ज व्याज परतावा व गट कर्ज व्याज परतावा योजनेतंर्गत पात्रता प्रमाणपत्र (Letter of Intent) प्राप्त अर्जदारांना व्यवसायाकरीता मुदत कर्ज धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण

**मा.संचालक मंडळ सभा दिनांक १९/०६/२०२५, ठराव क्रं.२१ अन्वये मंजूर**

**बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये वास्तव्य असलेल्या आणि शासनाच्या वेगवेगळया महामंडळापैकी कोणत्याही एका महामंडळाकडील वैयक्तिक कर्ज व्याज परतावा व गट कर्ज व्याज परतावा योजनेतंर्गत पात्रता प्रमाणपत्र (Letter of Intent) प्राप्त अर्जदारांना व्यवसायाकरीता मुदत कर्ज धोरण.**

**अर्जदारांसाठी पात्रता / निकष :-**

१. बँकेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य असलेल्या एका कुटंबातील एकच व्यक्ती अर्जदार बँक कर्ज मागणीस पात्र असेल.

२. अर्जदार, सहअर्जदार व जामिनदार यांचे मुंबई बँकेत बचत खाते उघडावे लागेल.

३. महाराष्ट्र शासनाच्या खालीलपैकी कोणत्याही महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र (LOI) सादर करणारे उमेदवार व गट बँक कर्ज मागणीस पात्र असतील.

अ) पर्यटन संचालनालय (DoT) महाराष्ट्र शासन

ब) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

क) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित.

ड) महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित.

४. **मुख्यमंत्री –** माझी लाडकी बहीण योजनेमधील पात्र लाभार्थी महिलेस शासनाच्या कोणत्याही महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झालेले असेल तर सदर महिला व महिलांचा गट बँक कर्ज मागणीस पात्र असेल.

५. अर्जदारांचा व गटांचा बँकेच्या कार्यक्षेत्रातील तसेच स्थानिक उपनगरीय रेल्वे सेवा उपलब्ध असलेल्या ठिकाणी चालू असलेला किंवा नियोजित व्यवसाय प्रकल्प कर्ज मंजूरी पात्र राहील, मात्र अर्जदार बँकेच्या कार्यक्षेत्रामध्येच वास्तव्यास असावेत.

६. रु.१.०० लाखापर्यंतच्या कर्जासाठी एक जामिनदार द्यावा लागेल. तसेच बँकेच्या रु.१.०० लाखावरील कर्जासाठी दोन सक्षम जामिनदार द्यावे लागतील. (सदर जामिनदार पगारदार किंवा व्यावसायिक असावेत.)

७. **सहअर्जदार –** बँकेच्या रु.१.०० लाखापर्यंतच्या कर्जासाठी कोलॅटरल सिक्युरिटी देण्याची आवश्यक नाही. मात्र रु.१.०० लाखावरील कर्जासाठी ज्या कर्जदाराकडे कोलॅटरल सिक्युरिटी देणेसाठी स्वत:च्या नावावर कोणत्याही प्रकारची मालमत्ता नाही त्या अर्जदाराने स्वतःच्या कुटूंबातील ज्या सदस्याच्या नावावर मालमत्ता आहे त्यास सहकर्जदार म्हणून घेण्यात येईल. (तारण द्यावयाची मालमत्ता बँकेच्या कार्यक्षेत्रातील किंवा व्यवसायाच्या ठिकाणामधील असावी.) किंवा कर्ज रक्कमेइतकी स्वतःची / नातेवाईकांची किंवा थर्ड पार्टी कोलॅटरल सिक्युरिटी (अंडरटेकिंग घेऊनच) घेण्यात येईल.

८. अर्जदारांने व गटाने महाराष्ट्र शासनाच्या महामंडळाकडून ज्या व्यवसायासाठी पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त करुन घेतलेले आहे. त्यांना त्याच व्यवसायासाठी बँक कर्ज मंजूर करण्यात येईल.

**कर्ज मागणी अर्जासोबत सादर कराव्याची कागदपत्रे :**

१ बँक कर्ज मागणी अर्ज ( बँकेच्या विहीत नमुन्यातील )

२ महाराष्ट्र शासनाच्या महामंडळाचे मुळ पात्रता प्रमाणपत्र (LOI) सादर करावे.

३ अ) अर्जदाराची के.वाय.सी.
I) आधार कार्ड–आवश्यक II) लाईट बील (मागील महिन्याचे) किंवा, III) रेशनिग कार्ड – यापैकी एक आवश्यक, IV) बँक खाते उतारा किंवा पासबुक झेरॉक्स (६ महिन्याच्या नोंदीसह ).
ब) सहअर्जदार/ जामिनदाराची के.वाय.सी I) आधार कार्ड–आवश्यक II) लाईट बील (मागील महिन्याचे) किंवा, III) रेशनिग कार्ड – यापैकी एक आवश्यक,

४ अर्जदाराने व्यवसायासाठी निवडलेली जागा स्वमालकीची असेल तर पुरावा म्हणून गाळा खरेदीखत, मासिक मेन्टेनेस बील /पावती, अद्यावत लाईटबील यापैकी कोणतेही दोन कागदपत्रे सादर करावी लागतील. अथवा व्यवसायाची जागा ३ ते ५ वर्षासाठी नोंदणीकृत भाडे करारावर घेतलेली असावी. सदर भाडेकराराची सत्यप्रत सादर करावी लागेल.

५ व्यवसायासाठी प्रचलित कायद्यानुसार आवश्यक परवाने सादर करावे. ( आवश्यकतेनुसार )

६ अर्जदाराची शैक्षणिक पात्रता तसेच व्यवसायासाठीचे शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र (व्यवसायाच्या स्वरुपानुसार)

७ बँकेच्या रु.१.०० लाखावरील कर्जासाठी व्यवसायाच्या प्रकल्प अहवालाच्या (प्रोजेक्ट रिपोर्ट) दोन प्रती सादर कराव्यात. सदर प्रकल्प अहवाल कोणत्याही सनदी लेखापाल (C.A.) यांच्या सही शिक्यानिशी तयार करुन, सदर अहवालाच्या Covering Letter वर कोणत्या कारणासाठी किती रक्कम अपेक्षित आहे ते नमूद करणे आवश्यक आहे. व्यवसायाच्या प्रकल्प अहवालानुसार खेळते भांडवलासाठी व भांडवली स्वरुपाचा कर्ज पुरवठा करणेसाठी बँकेकडून फक्त मुदत कर्जच मंजूर करण्यात येईल.

८ व्यवसायाचे गुमास्ता लायसन्स किंवा उद्योग आधार तसेच टॅक्स रजिस्ट्रेशन.

९ बँकेच्या रु.१.०० लाखावरील कर्जासाठी मंजूर कर्ज रक्कमे इतकी कोलॅटरल सिक्युरिटीपोटी जी मालमत्ता तारण द्यावयाची त्या मालमत्तेच्या आवश्यक **कागदपत्रांची छायांकित प्रत सादर करावी.** सदर मालमत्तेचे नोंदणीकृत गहाण खत अर्जदारास स्वखर्चाने करुन द्यावे लागेल. अथवा,
कर्ज मंजूर रक्कमे इतकी कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून अर्जदारास स्वतःच्या नावाची मुंबई बँकेतील मुदत ठेव (कर्ज कालावधीपर्यंत वैद्य असलेली) तसेच सोने, एन एस सी, किसान विकास पत्र, एल.आय.सी.विमा पॉलीसी सरेंन्डर व्हॅल्यु, (बँकेच्या नावे असाईन करुन) इत्यादी प्रकारातील कोणतीही सिक्युरिटी तारण म्हणून द्यावी लागेल. अथवा कर्ज रक्कमेइतकी स्वतःची / नातेवाईकांची किंवा थर्ड पार्टी कोलॅटरल सिक्युरिटी दयावी लागेल.

१०. बँकेच्या रु.१.०० लाखावरील कर्जासाठी अर्जदाराने रु.१०,०००/– इतक्या रक्कमेचा धनादेश कर्ज प्रस्ताव हाताळणी शुल्क (विना परतावा) म्हणून कर्ज प्रस्तावासोबत द्यावयाचा आहे. सदर रक्कमेतून वकीलाची व मुल्यांकनकराची फी अदा करण्यात येईल. तसेच बँकेच्या सनदी लेखापाल (C.A.) यांचेकडून व्यवसायाचा प्रकल्प आर्थिकदृष्टया किफायतशीर असल्या/नसल्याबाबतचा अहवाल घेण्यात येईल त्याचे व्यवसायिक शुल्क अदा करण्यात येईल. मात्र अर्जदाराने स्वखर्चाने सनदी लेखापालांचा प्रकल्प अहवाल सादर केल्यास अशा अर्जदाराकडून रु.४,०००/– इतकी रक्कम

प्रस्ताव हाताळणी शुल्क–विना परतावा म्हणून घेण्यात येईल.

बँकेची मुदत ठेव, एन.एस.सी., के.व्ही.पी., एल.आय.सी. विमा पॉलीसी, व सोने इत्यादी तारणासाठी लिगल व व्हॅल्युएशनची गरज नसल्याने प्रस्ताव हाताळणी शुल्क घेण्यात येणार नाही. मात्र सोने तारणाचे मुल्यांकनाची फी अर्जदाराने स्वत: अदा करावयाची आहे.

**कर्ज मंजूरीचे निकष व मर्यादा :–**

अ वैयक्तिक अर्जदारास शासनाच्या ज्या महामंडळाकडून पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झालेले असेल त्या महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत निश्चित केलेली कर्ज मर्यादा किंवा कमीत कमी रु.२५०००/– पासून ते कमाल रु.१५.०० लाखापर्यंत यापैकी जी कमी असेल ती कर्ज मर्यादा.

ब गटास शासनाच्या ज्या महामंडळाकडून पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झालेले असेल त्या महामंडळाच्या गट कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत निश्चित केलेली कर्ज मर्यादा किंवा कमीत कमी रु.२५०००/– पासून ते कमाल रु.१५.०० लाखापर्यंत यापैकी जी कमी असेल ती कर्ज मर्यादा.

**परतफेड कालावधी :** –

७ वर्षे मुदतीने मुदत कर्ज मंजूर केले जाईल. ( मंजूर कर्जाची उचल कर्ज मंजूरी पत्राच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करावी लागेल.)

**व्याजदर :** –

द.सा.द.शे.९% इतका राहील. कर्जदाराने बँक कर्जाचा दरमहाचा हप्ता (मुद्दल + व्याज) विहित वेळेत शाखेने कळविलेल्या तारखेला भरणा करावा. (कर्जदाराने विहित वेळेत भरणा केलेल्या हप्त्यामधील व्याजाची रक्कम संबंधीत महामंडळाकडून कर्जदाराच्या आधार लिंक खात्यामध्ये जमा करण्यात येते. व्याज परतावा मिळणेसाठी महामंडळाचे नियम लागू राहतील.)

**कर्ज वितरण :** –

व्यवसायाच्या प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेल्या १०% स्वभांडवलाची उभारणी केल्यानंतरच, व्यवसायाच्या स्वरुप आणि गरजेनुसार मंजूर कर्ज रक्कमेचे वितरण बँकेच्या सनदी लेखापाल यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार प्रकल्प खर्चाच्या ९०% **मात्र कमाल रु.१५.०० लाखापर्यंतच्या मर्यादेत** तसेच अर्जदाराचे मागणीनुसार, शाखाव्यवस्थापक व तपासणी अधिकारी यांच्या शिफारसीनुसार खेळते भांडवलासाठी लागणा–या रक्कमेचे वितरण करण्यात येईल. मात्र भांडवली स्वरुपाचा कर्ज पुरवठा साधन साहित्य पुरवठादारास बँकेच्या RTGS/ NEFT या सुविधेव्दारे थेट करण्यात येईल.

**कर्जदस्तऐवज –**

१ मंजूर कर्ज अटी व शर्ती, मान्य असलेसंबंधी पत्र.
२ डेबीट ॲथॉरीटी,
३ कर्ज करारनामा.
४ वचनचिठ्ठी
५ लेटर ऑफ लीन / सेट ऑफ
६ सातत्य हमी पत्र
७ जामीनदारांचा करारनामा.
८ कर्ज परतफेडीचे वैयक्तिक जबाबदारीचे हमीपत्र.
९ नजरगहाण करारपत्र

१६७



१० मॉर्गेज डीड

**सर्वसाधारण नियम व अटी**

१. कर्जदार, सहकर्जदार व जामिनदार यांनी बँकेचे नाममात्र सभासदत्व (फी ची रक्कम भरणा करुन) घेणे आवश्यक आहे.

२. बँक कर्ज मंजूरीची रक्कम रु.१.०० लाखापर्यंत असेल तर बँकेच्या नियमानुसार कर्जदार गटाचे संयुक्त बचत खाते (जॉईंट अकाऊंट) उघडण्यात यावे.

३. बँक कर्ज मंजूरीची रक्कम रु.१.०० लाखाच्या वरील असेल तर वैयक्तिक कर्जदारास व गटास बँक नियमानुसार व्यवसायाचे चालु खाते उघडणे आवश्यक राहील. दैनंदिन व्यवहारातील जमा रक्कमेचा भरणा याच खात्यात करावा लागेल.

४. बँक कर्ज मंजूरीची रक्कम रु.१.०० लाखापर्यंत असेल तर कर्जदार व गटाने रु.१०/– प्रतिदिन किंवा दर आठवड्यास रू.७०/– किंवा प्रत्येक महिन्यास रू.३००/– इतक्या रक्कमेचे मुंबादेवी दैनंदिन ठेव खाते उघडून त्या मध्ये ठेव रक्कम स्वतः रक्कम जमा करावी लागेल.

मात्र कर्ज मंजूरीची रक्कम रु.१.०० लाखावरील असेल तर कर्जदार व गटाने रु.१.०० लाखास रु.७५/– प्रतीदिन याप्रमाणे मात्र त्यापुढील रक्कम कर्ज मंजूर मर्यादेच्या पटीत दैनंदिन ठेव पोटी रक्कम जमा करावी.

बँकेचे मुदत कर्ज निरंक होईपर्यंत मुंबादेवी ठेव योजनेतून कर्ज मंजूर केले जाणार नाही. तसेच सदर खात्यातून नावे रक्कम दिली जाणार नाही. तसेच बँकेचा कर्ज हप्ता थकीत झाल्यास सदर खात्यातील शिल्लक रक्कमेतून कर्जाचा हप्ता तसेच कर्जाची थकबाकी वसुल करण्याचे अधिकार बँकेस राहतील तशा आशयाचे अंडरटेकींग कर्जदारास द्यावे लागेल.

५. बँक कर्जाची रक्कम बँकेच्या तपासणीस यांचे पहाणी /छाननीनंतर अदा केली जाईल. मशिनरी व साधन / सामुग्री खरेदीसाठी रक्कम परस्पर विक्रेत्यास अदा केली जाईल. (आवश्यकते नुसार)

६. कर्जदाराने दरमहाचा हप्ता शांखेने कळविलेल्या तारखेला भरणा करावा अन्यथा कर्ज थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर २% दंडव्याज आकारले जाईल.

७. कर्ज रक्कमेची संपूर्ण परतफेड होईपर्यंत, कर्ज रक्कमेचा विनियोग केवळ कर्ज ज्या कारणाकरीता घेतले आहे त्यासंबंधित व्यावसायिक गरजा भागविण्यासाठी करावयाचा आहे. तसेच सर्व आर्थिक व्यवहार या बँकेच्या खात्यावर करणे आवश्यक आहे.

८. कर्ज परतफेडीची प्राथमिक जबाबदारी कर्जदाराची राहिल. त्याचबरोबर तेवढीच जबाबदारी कर्जदार व जामिनदारावर संयुक्त व वैयक्तिकरित्या राहिल व ती त्यांच्या वारसावरही राहिल. त्यांच्यापैकी कोणीही एका अगर अधिक व्यक्तीकडून कर्जाची वसुली करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

९. बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय कर्जदारास अन्य कोणत्याही बँकेकडून व अन्य संस्थेकडून कर्ज घेता येणार नाही.

१०.व्यावसायाच्या ठिकाणी नियुक्त करावयाच्या सेवकांची नियुक्ती, वेतन किंवा इतर देय रक्कम इत्यादींची जबाबदारी संबंधीत कर्जदार यांची राहील.

११.बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास व्यवसायाच्या ठिकाणी व निवासी पत्त्यावर भेट देण्याचा तसेच केव्हाही दप्तर तपासण्याचा व साठामाल तपासण्याचा अधिकार राहील.

१२.व्यावसायाचे जागेच्या ठिकाणी "मुंबै बँकेकडून अर्थसहाय्यीत"असा फलक प्रदर्शनी भागावर लावला पाहिजे. (आवश्यकतेनुसार)

१३.कर्जदार व जामिनदाराने वास्तव्याचा अथवा व्यावसायाच्या पत्त्यात बदल केल्यास त्वरीत बँकेला कळविणे आवश्यक आहे.

१४.कर्ज कालावधीमध्ये कर्जदारास किंवा गटास महाराष्ट्र शासनाच्या संबंधित महामंडळाने काही कारणाने अपात्र करुन किंवा इतर कोणत्याही कारणाने व्याज परतावा रक्कम आधारलिंक खात्यात जमा केली नाही. तर त्या संदर्भातील कोणत्याही तक्रारीस मुंबै बँक जबाबदार असणार नाही. कर्जदारांनी बँक कर्जाची विहीत वेळेत व्याजासही परतफेड करावयाची आहे.

१५. कर्जदाराने शिल्लक मालाचा, वाहनाचा, मशिनरीचा विमा, विमा कंपनीकडून उतरविला पाहीजे. विमा पॉलीसी कर्जदार व बँक यांच्या संयुक्त नावे घेण्यात यावी. विम्याचा खर्च कर्जदाराने करावयाचा आहे.

१६. कर्जदाराचे प्रत्येक महिन्याच्या अखेरचे तेरीज पत्रक, नफा – तोटा पत्रक व ताळेबंद तसेच शिल्लक मालाचे पत्रक (C.A. प्रमाणित) पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत शाखेस सादर करणे आवश्यक आहे. (आवश्यतेनुसार)

१७. कर्जदाराने / सहकर्जदाराने तारण ठेवलेल्या मालमत्तेची / तारणाची मूळ कागदपत्रे बँकेकडे जमा केल्यानतरच मंजूर कर्जाची उचल देण्यात येईल

१८. कोणत्याही अटीत पूर्व सूचनेशिवाय बदल करण्याचा व अटी रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

**कर्ज मंजूरी व वितरण प्रक्रीया**

१. शाखा व्यवस्थापकांना प्राप्त झालेल्या कर्ज मागणी अर्जाचा अभ्यास करुन संबंधित कर्ज धोरणानुसार सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेसंबंधी खात्री करुन, बँकेच्या नियमात बसत असेल तरच अशा कर्ज मागणी प्रस्तावाची तपासणी शाखा व्यवस्थापक/ शाखेतील अधिकारी यांचेकडून करुन घेण्यात यावी. बँकेच्या तपासणी अधिकारी यांनी अर्जदार व जामिनदाराच्या वास्तव्याच्या तसेच व्यवसायाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून जबाबदारीने खातरजमा करावी. त्याचसोबत अर्जदाराने निवडलेल्या व्यवसायामधून त्यास बँक कर्जाची परतफेड करणे शक्य होईल याची सुध्दा खात्री करावी. अर्जदाराच्या व जामिनदाराच्या संबंधित जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करून घ्यावी. सदरची माहिती अहवालात नमूद करावी. तसेच अर्जदारास मंजूर करावयाच्या रक्कमेस शिफारस आहे / नाही याचा स्पष्ट उल्लेख अहवालात नमूद करावा. तारण मालमत्तेच्या गहाण खताची प्रक्रिया शाखेने करावयाची असून केलेल्या कार्यवाहीची माहिती विभागीय कार्यालयास सादर करावी.

अर्जदार व जामिनदार यांची तपासणी अहवालात नमूद असलेली माहिती, बँक कर्ज धोरणातील तरतूदी बँकेचे नियम इ. बाबी विचारात घेवून अशी कर्जे मंजूर / नामंजूर करण्याचे तसेच कर्ज उचलीचे अधिकार खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कर्ज मर्यादा | कर्ज मंजुरीचे अधिकार | प्रत्यक्षात कर्ज उचल |
|---|---|---|---|
| १ | रू.५.०० लाखापर्यंत | शाखा व्यवस्थापक | शाखास्तरावर देण्यात यावी. |
| २ | रू.५.०० लाखांवरील ते रू.१५.०० लाखांपर्यंत | विभागीय व्यवस्थापक/ विभाग प्रमुख, वैयक्तिक कर्ज विभाग | शाखास्तरावर देण्यात यावी. |

तथापि, शाखा व्यवस्थापक यांनी रू.५.०० लाखांवरील कर्ज प्रस्ताव (शाखास्तरावर बँकेच्या कर्ज धोरणानुसार कर्ज प्रस्तावांची तपासणी पूर्ण करून छानणी अहवालासह) पुढील कार्यवाहासाठी विभाग प्रमुख, वैयक्तिक कर्ज विभाग, केंद्र कार्यालय यांचेकडे पाठवावे. या कर्ज धोरणानुषंगाने शाखांकडून होणाऱ्या सर्व कार्यवाहीचे (उदा.अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे, शाखेने केलेली खातरजमा, कर्ज मंजूर / नामंजूरीस शिफारस इ.) नियंत्रण विभागीय कार्यालय, वैयक्तिक कर्ज विभाग, केंद्र कार्यालय यांच्याकडे राहील.

२. शाखास्तरावर प्राप्त झालेल्या कर्जमागणी प्रस्तावाची नोंद संबंधित शाखेने स्वतंत्र मुव्हमेंट रजिस्टर मध्ये ठेवावयाची असून, कर्ज मंजूरी पत्र किंवा कर्ज नामंजूर केल्यास कारणांसह नामंजूरी पत्र, शाखा व्यवस्थापक यांनी वैयक्तिक कर्ज विभागास (विभागीय कार्यालय) पाठवावयाचे आहे.

३. बँक कर्जाची थकबाकी होणार नाही याची दक्षता शाखा व्यवस्थापक यांनी घ्यावयाची आहे.

४. कर्जदार यांना कर्ज उचल दिलेल्या महिन्यापासून / तारखेपासून त्यांचे मुंबादेवी दैनंदिन ठेव खाते उघडून संबंधित कर्जदाराकडून दैनंदिन ठेव रक्कम त्याचे खात्यात जमा करणेबाबत अवगत करावे.

५. बँक कर्ज थकीत गेल्यास थकबाकी तसेच संपूर्ण बँक कर्जाची वसूली बँकेच्या कायदा व कर्ज वसुली विभागामार्फत शाखांना दिलेल्या सुचनांनुसार शाखांनी करावयाची आहे.